Serial Number ↓

0001826

| E-809 | Roll No. ................................... |
|---|---|
| Higher Secondary Examination (Regular) - 2020 | |
| मराठी (सामान्य) MARATHI (General) | |

| Total Questions : 25 | Total Printed Pages : 7+1 Blank | Time : 3 Hours | Maximum Marks : 100 |
|---|---|---|---|

निर्देश : सर्व प्रश्न आवश्यक आहेत.

1 रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा. 5

(1) शेतकरी लोकास शेतकीच्या कामास _________ असणे ही मुख्य गोष्ट आहे. (पाणी, औजारे)

(2) माझे _________ मन व्याकूळ होऊन गेले. (पाढंरपेशी, दुःखी)

(3) "जिभेवर _________ ठेवावी ना, तितकं बरं वाटतं. (खडीसाखर, साखर)

(4) इथूनच शब्दांच्या हाती _________ मी ठेवीत आहे. (फुले, पाने)

(5) _________ पोरीसारखी चार भितंति नाचली. (माहेरवाशीण, सासुरवाशीण)

2 योग्य जोड्या जुळवा : 5

| 'अ' | 'ब' |
|---|---|
| (1) भारतीय लोकांचा व्यापार | (i) केशवसुत |
| (2) अभंग संस्कार | (ii) ज्ञानेश्वर |
| (3) काळे केस | (iii) लोकहितवादी |
| (4) गुरुमहिमा | (iv) ना. सी. फडके |
| (5) वातचक्र | (v) गो. नी. दाण्डेकर |
| | (vi) महात्मा फुले |
| | (vii) कुसुमाग्रज |

3 सत्य/असत्य लिहा. 5

(1) कला लेखिकेला धोबिणीची राणी वाटे.

(2) 'काळे केस' हा लेख लेखकाला चहा पितांना सुचला.

(3) सिद्धेश्वराला भविष्य पाहण्याचे वेड आहे.

(4) गोपाळांच्या लीला आकाशातून देवलोक पाहात होते.

(5) देशभक्त देशाला देव मानत नाहीत.

4 एका वाक्यात उत्तरे लिहा. 5

(1) ज्ञानदेव श्वासागणिक काय निर्माण व्हावे म्हणतात ?

(2) तेजस्वी शब्दांना कोणी मळविले आहे ?

(3) महात्मा फुले हे एक घोर समाजसेवक होऊन गेले. (विशेषण ओळखा)

(4) भारतीय लोकांचा व्यापार बुडाला. (काळ ओळखा)

(5) पोलिसांनी चोराला पकडले. (क्रियापद ओळखा)

5 वाकप्रचारांचा अर्थ लिहा. 5

(1) थरकाप उडणे

(2) काबूत ठेवणे

(3) पारा चढणे

(4) मन सरावणे

(5) अवहेलना करणे

अति लघुउत्तरीय प्रश्न (शब्द मर्यादा 30 शब्द)

6 लोक अधिक आळशी व मुर्ख कशाने होतील ? 2

**किंवा**

लेखकाच्या मते कल्पना ही कोणासारखी लहरी असते ?

7 गेल्या बारा वर्षापासून कोणी संध्या केळी नसते ? 2

**किंवा**

कोणते साल लेखकाच्या क्रीडाजीवनात क्रान्तिकारक ठरले ?

8 प्रापंचिकांना धनाबद्यल तुकारामांनी कोणता सल्ला दिळी आहे ? 2

**किंवा**

गोपाळांनी गळ्यात कोणत्या माळा घातल्या होत्या ?

9 लोकसेवेत मग्न असणाऱ्यांना कशाची पर्वा वाटत नाही ? 2

**किंवा**

नायकाच्या धरी कोण पाहुणी आली होती ?

10 समानार्थी शब्द लिहा. 2

(1) आराधना

(2) गूढ

**किंवा**

(1) पर्जन्य

(2) मुख

11 विरुद्धार्थी शब्द लिहा. 2

(1) रात्र

(2) नवे

किंवा

(1) प्रसन्न

(2) शुभ

12 खालील शब्दांपैकी बिनचूक शब्द ओळखून लिहा. 2

(1) लक्ष्मी, लक्षमी, लक्ष्मि, लक्षुमी

(2) युक्ती, युक्ति, युकती, युकति

किंवा

'प्र' व 'अ' उपसर्ग लावून प्रत्येकी दोन–दोन शब्द लिहा.

13 'काळ' कशास म्हणतात ते सांगुन प्रकार लिहा व उदाहरण द्या. 2

किंवा

पुढील वाक्यातील काळ ओळखा.

(1) दुकानदाराने आज दुकान बंद केले.

(2) बाबांची पगार परवा मिळेल.

0001826
0001826
0001826
0001826

दीर्घउत्तरीय प्रश्न (शब्द मर्यादा 75 ते 120 शब्द)

14 ज्ञानेश्वरांनी सद्गुरुचा महिमा कशाप्रकारे वर्णन केला आहे ? 4

किंवा

कीर्तनाच्या माध्यमातून नामदेवांना कोणते कार्य करायचे आहे ?

15 कवीला वातचक्रात शब्दांना फेकून द्यावे, असे कां बाटते ? 4

किंवा

'कणा' या कवितेतील नायकाची आपल्या सरांकडून काय अपेक्षा आहे ?

16 परदेशी वस्तु विक्त घेणारे हिंदुस्थानातील लोक कोणत्या स्वदेशी वस्तु वापरतात ? 4

किंवा

लेखिकेला कलाशी बोलण्यात गंमत का वाटत असे ?

17 लेखक नंदू नाटेकर यांनी स्वतःला कोणती शिस्त लावून घेतली होती ? 4

किंवा

'अभंग संस्कार' मधे मनूच्या रुपाचे वर्णन लेखकाने कसे केळे आहे ?

18 रावबहाद्दूरांचा चष्मा कसा हरवला व कसा सापउला ते स्पष्ट करा. 4

किंवा

औंधजवळील जमीनीवर कोणते आश्चर्य घडले ?

19 'संधी' म्हणजे काय ते सांगून प्रकाराची नावे उदाहरणासहित लिहा. 4

किंवा

'समास' म्हणजे काय ते सांगून प्रकाराची नावे उदाहरणासहित लिहा.



0001826

दीर्घउत्तरीय प्रश्न (शब्द मर्यादा 120-150 शब्द)

20 पक्षी तडफडतो आहे, आर्त गाणं गातो आहे. 5

**किंवा**

''विलायतेतील लोकांप्रमाणे अक्कलवान व्हा–म्हणजे लक्ष्मी तुम्हास अनुकूल होईल''.

21 संदर्भासहित अर्थ स्पष्ट करा. 5

गावची गुरे वळली असती, असल्या
इंगळ्या डसल्या नसत्या.

**किंवा**

परउपकारी नेणे परनिंदा । परस्त्रिया सदा बहिणी माया ॥

22 परिचय लिहा. 5

नामदेव

**किंवा**

महात्मा फुले

23 उतारा वाचून त्या खालील प्रश्नांची उत्तरे लिहा. 5

दुःखे येतात ती आपली कसोटी पाहण्यासाठीच येतात. त्या वेळी न डगमगणे हाच खरा पुरुषार्थ. भट्टीतून तावून सूलाखून निघाल्याखेरीज सोन्याला तेज चढत नाही किंवा टाकीचे घाव सोसल्याशिवाय दगडाला देवपण येत नाही. आपल्यावर कोसळणारी दुःखे ही अशीच आपल्या व्यक्तिमत्वाला पैलू पाडण्यासाठी निर्माण झाली आहेत असे आपण का समजू नये ? जगात दुःखे आहेत म्हणून सुखाची किंमत आपणास कळते. शिवाय दुःखानंतर सुख आले म्हणजे त्याची लज्जत काही न्यारीच असते. परीक्षेसाठी अतोनात कष्ट केल्यानंतरच निकालाच्या आनंदाची खरी गोडी आपणास कळेत. असेजर आहे तर वर्तमानकाळच्या दुःखाबद्यल आपण कूरकूर कां करावी ?

**प्रश्न :**

(1) आयुष्यात दुःखे कां येतात ?

(2) सोन्याला तेज केंव्हा चढते ?

(3) आपणास सुखाची किंमत कशामुळे कळेत ?

(4) वर्तमानकाळच्या दुःखाबद्यल आपण काय करु नये ?

(5) उताऱ्यास योग्य शीर्षक द्या.

24 तुमच्या लहान भावा / बहिणीस नियमित अभ्यास करण्या बाबतेच पत्र लिहा. 5

**किंवा**

तुमच्या शाळेत स्नेहसम्मेलनात हजर राहिलेल्या पाहुण्यांचे आभार मानणारे पत्र लिहा.

25 एका विषयावर निबंध लिहा. 10

(1) संगणक–शाप की वरदान

(2) अति तेथे माती

(3) प्रदूषण – एक भयंकर संकट

(4) अंधश्रद्धा – एक शाप

(5) श्रममेव जयते

---

Blank Page

0001826 0001826 0001826 0001826